# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0231 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/07/2025 21:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 16/07/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/07/2025
**Time From (वेळेपासून):** 14:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/07/2025 **Time (वेळ):** 21:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/07/2025 21:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्य

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समाधान नानाभाउ वाघ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साळवे, ताशिंदखेडा जि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साळवे, ताशिंदखेडा जि धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9890937533

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शुभम भिका देव | | | 1. आदर्श कॉलनी, वडेल रोड देवपुर ,धुळे,धुळे शहर,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली व हस्तगत केलेली रक्कम | 5,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

धुळे शहर पोलीस ठाणे गुरनं 231/2025 भ्र.प्र .का.सन.1988 चे कलम 7कलम प्रमाणे यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की,मी समाधान नानाभाऊ वाघ, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती/ खाजगी ठेकेदार, रा. साळवे, ता. शिंदखेडा, जि. धुळे, मो. नं. 9890937533
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, जानेवारी 2024 मध्ये मला आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) यांच्याकडुन वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने अंतर्गत रोजगारासाठी इंडसइंड बँक, शाखा धुळे यांचेकडुन जेसीबी घेण्याकरीता कर्ज मिळण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र मिळाले होते. त्याप्रमाणे मला इंडसइंड बँक धुळे यांचेकडुन जेसीबी घेण्यासाठी 24,96,000/- रुपये वैयक्तिक कर्ज मंजुर होवुन त्या रकमेतुन मी जेसीबी खरेदी केलेले आहे. सदर कर्जाच्या हप्त्याची मी व्याज मुददलासह मुदतीत परतफेड करीत असुन आतापावेतो प्रतीमाह 55,128/- रुपये याप्रमाणे एकुण 18 हत्ते मी बँकेस भरलेले आहेत. आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजने अंतर्गत मी घेतलेल्या कर्जाची परतफेड केलेल्या व्याजाची रक्कम मला परत मिळणेकरीता मी बँकेकडील कर्जफेडी बाबतची कागदपत्रे घेवुन महामंडळाच्या धुळे येथील कार्यालयात दि.14.07.2025 रोजी जावुन तेथे जिल्हा समन्वयक शुभम भिका देव यांची भेट घेतली असता त्यांनी माझे कडुन कर्जाचा व्याज परतावा मिळणे करीताची आवश्यक कागदपत्रे माझयाकडुन जमा करुन घेवुन व्याज परताव्याचा प्रस्ताव महामंडळाच्या मुंबई कार्यालयाकडे पाठविण्यासाठी त्यांनी माझयाकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम धुळे शहरातील फुलवाला चौकात घेवुन बोलविले असल्याची मी दि.16.07.2025 रोजी ला.प्र.विभाग, धुळे कार्यालयात हजर राहुन श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक यां ेचेकडे तक्रार दिली होती. त्यानंतर माझयाकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला व पंच नं. 01 प्रभाकर पाटील यांना धुळे शहरातील फुलवाला चौक येथे रवाना केले. तेथे पोहोचल्यावर माझया मोबाईलवरुन शुभम देव यांच्या मोबाईलवर फोन करुन त्यांना फुलवाला चौकात आलो असल्याचे सांगितले, तेव्हा त्यांनी मला ठाकुर वॉच दुकानासमोर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच पाटील असे ठाकुर वॉच दुकानासमोर गेलो. तेथे माझी शुभम देव यांचेशी भेट झाली. तेव्हा त्यांनी माझयाशी माझया कामाबाबत चर्चा केली. तेव्हा शुभम देव यांनी चर्चा करुन माझयाकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम त्यांच्या कार्यालयाकडे घेवुन येण्यास सांगितले होते. त्यानंतर मी व पंच पाटील असे ला.प्र.वि. धुळे कार्यालयात परत आल्यावर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ए ेकुण तसेच मी व पंच पाटील यांनी कथन केलेल्या हकिगतीवरुन शुभम देव यांनी माझयाकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची पोलीस निरीक्षक श्रीमती कलाल यांची खात्री झाल्यावर त्यांनी शुभम देव यांचेवर सापळा आयोजित करुन माझ्याकडुन 500/- रुपये दराच्या 10 नोटा असे एकुण 5,000/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सदरची रक्कम माझया पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर माझयाकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला माझया दुचाकीने पंच पाटील यांचेसह शुभम देव यांच्या कार्यालयात रवाना केले. तेव्हा मी धुळे शहरातील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ गेलो. तेव्हा मी माझया मोबाईलवरुन शुभम देव यांना फोन करुन भेटण्यास आलो असले बाबत सांगितले असता त्यांनी मला तुम्ही कार्यालयाबाहेर थांबा मी बाहेर येतो असे सांगितले. त्यानंतर ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रवेशद्वाराचे बाहेर आल्यावर मी त्यांची भेट घेतली, तेव्हा आमचेत माझया कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा शुभम देव यांनी माझयाकडे पैशांची मागणी केली असता मी माझया डाव्या हाताने पॅन्टचे डावे खिशातुन लाचेची रक्कम काढुन त्यांच्या समोर धरली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवुन घेतली. तेव्हा मी ठरवुन दिलेला इशारा केल्यावर पोलीस निरीक्षक श्रीमती कलाल व सापळा पथकाने जिल्हा समन्वयक शुभम भिका देव यांना ताब्यात घेतले. मी जेसीबी घेण्याकरीता घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीतील व्याजाची रक्कमेचा परतावा मिळणेकरीता प्रस्ताव आण्णासाहेब पाटील आर्थिक



Scanned with OKEN Scanner

मागास विकास महामंडळ मर्या. मुंबई कार्यालयाकडे पाठविण्यासाठी शुभम देव, जिल्हा समन्वयक, आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या .धुळे रा.आदर्श कॉलनी वडेल रोड धुळे देवपुर धुळे यांनी ५००० /- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम धुळे शहरातील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रवेशव्दारासमोर दि.१६/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष स्विकारली आहे म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कारवाइ होणेबाबत माझी फिर्याद आहे.वगैरे मजकुरवरुन गुन्हा रजि दाखल करुन मा. पोनि. सो. यांच्या आदेशाने पोनि. पदमावती कलाल, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे यांना देण्यात आला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dipak dagadu patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमंलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन



Scanned with OKEN Scanner